आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१६ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्यासाठी भारत सज्ज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं नवीकरणीय उर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदार परिषदेत प्रतिपादन
- सहा वंदे भारत रेल्वेगाड्यांना प्रधानमंत्र्यांनी दूरस्थ पद्धतीनं दाखवला हिरवा झेंडा / महाराष्ट्रातल्या ३ गाड्यांचा समावेश
- जम्मू - काश्मीरमध्ये दहशतवादाचं पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सरकारनं गाडून टाकले असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

  **आणि**
- आशिया हॉकी स्पर्धेत दक्षिण कोरियावर ४-१ अशी मात करत भारताची अंतिम फेरीत धडक

**<><><><><>**

हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्यासाठी भारत सज्ज असून याचाच भाग म्हणून सरकारनं २० हजार कोटी रुपयांच्या ग्रीन हायड्रोजन मिशनला सुरुवात केली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधे गांधीनगर इथं आयोजित चौथ्या जागतिक नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदारांच्या परिषदेत बोलत होते. केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेला संबोधित करताना प्रधानमंत्र्यांनी भारताने ऊर्जा क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले....

**बाईट- प्रधानमंत्री (३० सेकंद)**

भारतानं हरित ऊर्जा क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. ३१ हजार मेगावॅट जलविद्युत निर्मितीच्या प्रकल्पाचं काम सुरू असून यासाठी १२ हजार कोटी रुपये खर्च येणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

यावेळी त्यांनी पीएम सूर्यघर योजनेच्या यशाबद्दल कौतुक केलं. आतापर्यंत देशभरातल्या सव्वा तीन लाख घरांमध्ये सौर पॅनल बसवण्यात आले आहेत. २१ व्या शतकाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा भारताच्या सौर क्रांतीचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल, असं ते म्हणाले.

या परिषदेला गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आदी उपस्थित होते.

३ दिवस चालणाऱ्या या परिषदेत महाराष्ट्रासह देशातली अनेक राज्यं सादरीकरण करणार आहेत. तसंच देशोदेशीहून मोठ्या संख्येनं प्रतिनिधी परिषदेत सहभागी होत आहेत.

**या परिषदेनंतर** मोदी यांनी अहमदाबाद ते गांधीनगर या मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला हिरवा झेंडा दाखवला. तसंच अहमदाबाद ते भुज या वंदे भारत मेट्रोसह ८ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी केली. अहमदाबाद ते भुज ही देशातली पहिली वंदे भारत मेट्रो आहे. सध्याचा काळ हा भारतासाठी सुवर्णकाळ असून पुढच्या २५ वर्षांत भारताचा समावेश विकसित देशांमध्ये होईल, असा विश्वास मोदी यांनी यावेळी झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केला.

**प्रधानमंत्र्यांनी आज सहा वंदे भारत** रेल्वेगाड्यांना दूरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. यात राज्यातल्या नागपूर ते सिकंदराबाद, कोल्हापूर ते पुणे आणि पुणे ते हुबळी यांच्यासह, छत्तीसगडमधल्या दुर्ग ते विशाखापट्टणम, तसंच आग्रा ते वाराणसी आणि वाराणसी ते दिल्ली या रेल्वेगाड्यांचा समावेश आहे. याशिवाय मोदी यांनी प्रधानमंत्री ग्रामीण आवाज योजने अंतर्गत तीस हजार घरांना मंजुरी दिली. तसंच यासाठीचा पहिला हफ्ता जारी केला.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादाचं पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सरकारनं गाडून टाकले आहेत, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. किश्तवरमधल्या पड्डेर - नागसेनी मतदारसंघात सुनिल शर्मा यांच्या प्रचारासाठी आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते. काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या जाहिरनाम्यात दहशतवाद्यांना मुक्त करण्याचा उल्लेख आहे असा आरोप शहा यांनी केला. सरकार स्थापन केल्यानंतर ३७० कलम पुनर्स्थापित करू, असं वचन काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सने दिलं आहे.  त्यामुळे त्यांना पहाडी, गुज्जर आणि इतरांचं आरक्षण हिसकावून घ्यायचं आहे असा आरोप शहा यांनी केला.

<><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी आज नवी दिल्ली इथं भास्कर अर्थात भारत स्टार्टअप नॉलेज ऍक्सेस रजिस्ट्रीचं अनावरण केलं. स्टार्ट अप्स, गुंतवणूकदार, सेवा प्रदाते आणि नियंत्रक यांच्यात परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठई भास्कर उपयोगी पडणार आहे. स्टार्टअप उद्योगामध्ये भारताला जागतिक केंद्र बनवण्याचं आवाहन पियूष गोयल यांनी यावेळी केलं. हे ऑनलाईन व्यासपीठ या क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी प्रेरणा ठरेल असंही ते म्हणाले.

<><><><>

अनेक ठिकाणी आज ईद - ए - मिलाद - उन - नबी  म्हणजेच प्रेषित मोहम्मद पैगंबरांची जयंती उत्साहात साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेला त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषित मोहम्मद पैगंबरांनी प्रत्येकाला प्रेम आणि बंधुत्वाच्या भावनांना बळ देण्यासाठी प्रेरित केलं, त्यांनी समाजात दया, मानवतेचा प्रसार केला असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

प्रेषित हजरत मोहम्मदांची मानवता आणि बंधुभावाची शिकवण निरंतर जगाला मार्गदर्शन करीत राहील असं उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

या सणाच्या निमित्ताने सर्वत्र आनंद, समृद्धी, एकोपा आणि सामंजस्याचं दर्शन घडावं, अशी शुभेच्छा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

थायलंडमध्ये बँकाकमधलं महाराष्ट्र मंडळ जवळपास ३५ वर्षांपासून गणेशोत्सव साजरं करतेय. ३०-४० लोकांपासून सुरू झालेला उत्सव आता २०० सदस्यांच्या पुढे गेला आहे. नियमित गणेशोत्सवाच्या सोबतच इथं विविध प्रकारची सामाजिक कार्यही केली जातात. या गणेशोत्सवाविषयी महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा अर्पिता कुलकर्णी म्हणाल्या…

**होल्ड अर्पिता कुलकर्णी, थायलंड**

**<><><><><>**

चीनमधल्या हुलनबीर इथं सुरु असलेल्या आशिया हॉकी स्पर्धेत आज झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात दक्षिण कोरियावर ४-१ अशी मात करत भारतीय संघानं अंतिम फेरीत धडक मारली आहे.  हरमनप्रीत सिंगनं दोन, तर उत्तम सिंग आणि जरमनप्रीत सिंग यांनी प्रत्येकी एक गोल करत भारताच्या आजच्या विजयात महत्वाची भूमिका बजावली. दक्षिण कोरियाचा संघ मात्र एकमेव गोल नोंदवू शकला.

भारतीय संघाचा अंतिम सामना उद्या यजमान चीनच्या संघाशी होणार आहे.

**<><><><><>**

भारतानं फ्रान्स इथं झालेल्या वर्ल्ड स्किल्स २०२४ स्पर्धेत १६, पदकं आणि मेडलिअन्स ऑफ एक्सलन्स पुरस्कार मिळवले आहेत. बेकरी उत्पादनं आणि मिठाई उद्योग, हॉटेल रिसेप्शन आणि नवीकरणीय उर्जा या विभागाच्या चार कास्यपदकांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त भारतीय पथकानं विविध व्यापार आणि विशेष कौशल्यांच्या विभागात उत्कृष्टतेचे १२ पुरस्कार मिळवले आहेत.

भारतीय पथकानं त्यांच्या कठोर परिश्रमानं देशाला अभिमान वाटावा अशी कामगिरी केली आहे, असे प्रशंसोद्गार कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांनी काढले आहेत.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांसाठी स्थानिक प्रशासन सज्ज होत आहे. जम्मू काश्मीरमधे मुख्य निवडणूक अधिकारी पी. के. पोल यांनी मतदारांसाठी विशेष जागृती अभियान सुरु केलं आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाचा स्वीप कार्यक्रम येत्या १८ सप्टेंबरपासून पूर्ण केंद्रशासित प्रदेशात राबवला जाणार आहे. या जागृती अभियानात मतदार मतदान करण्याची शपथ घेणार असून त्यांना मतदान प्रतिबद्धतेचं प्रमाणपत्र दिलं जाईल. जम्मू काश्मीरमधे येत्या १८ सप्टेंबरला पहिल्या टप्प्यातलं मतदान होणार आहे. २५ सप्टेंबरला दुसऱ्या टप्प्यातलं तर १ ऑक्टोबरला तिसऱ्या टप्प्यातलं मतदान होईल.

हरियाणात राज्य पोलिसांखेरीज केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या २२५ कंपन्या निवडणूक प्रक्रीयेसाठी तैनात असतील. निवडणूक प्रक्रीया भयमुक्त आणि पारदर्शी पद्धतीनं व्हावी याकरता मतदान यंत्र, मतदान केंद्र आणि मतमोजणी केंद्रांच्या सुरक्षेवर विशेष लक्ष दिलं जात असल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी पंकज अगरवाल यांनी सांगितलं.

हरियाणात एकाच टप्प्यात येत्या ५ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. दोन्ही राज्यांमधली मतमोजणी ८ ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><><>**

आठव्या भारत जल सप्ताह २०२४ ची सुरुवात उद्या नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं होणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या कार्यक्रमाचं उद्घाटन करतील. चार दिवसांच्या या कार्यक्रमात ४० देशातले दोनशे प्रतिनिधी सहभागी होतील. या कार्यक्रमात शंभरहून अधिक दालनं आणि जलक्षेत्रातले स्टार्टअप्स आपल्या संकल्पना मांडतील.

**<><><><><>**

शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविषयी केलेलं वक्तव्य हिंसेला चिथावणी देणारं असल्यानं त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन कारवाई करावी, अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<><><><><>**